ISSN :2348-7143 (Online)
July-Sept.- 2015

# भारूड : विषयातील विशाल दृष्टीकोन

**प्रा. संगीता सूर्यवंशी**
मराठी विभाग प्रमुख
**के. आर. एम. महिला (कला व वाणिज्य) महाविद्यालय,**
**नांदेड. महाराष्ट्र, भारत.**

*लोकरंजनाच्या माध्यमातून लोकांना रंजनाबरोबरच परमार्थ आणि नीती यांचे पाठ द्यावेत अशी नाथांची अंतरीक तळमळ होती. म्हणून त्यांनी दैनंदिन जीवनातील, समाजातील, कुंटुंबातील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती, पशु-पक्षी-प्राणी, घटना-प्रसंग-अनुभव आणि मनोरंजनाची साधने यांच्या माध्यमातून लोकांच्या अनुभवाच्या आधारे लोकभाषेतून त्यांनी परमार्थाचे यथार्थ वर्णन भारुडांच्या रुपाने लोकापुढे ठेवले. नाथांच्या कल्पकतेतून, चिंतनशिलतेतून आणि लोकोद्धाराच्या तळमळीतून निर्माण झालेले भारुडांचे विश्व अनुभव संपन्न बनले. आजही नाथांची भारुडे मराठी लोकजीवनात लोकप्रिय ठरत आहेत.*

भारूड हा शब्द समोर आला की, प्रथम संत एकनाथाचे नाव सर्वांना अभिप्रेत असते. ते एक चिंतनशील वृतीचे समाजशिक्षक होते. तत्कालीन समाजजीवनाचे त्यांनी सूक्ष्म अवलोकन व निरीक्षण कलेले असल्यामुळे समाजजीवनातील विविध वृत्ती-प्रवृत्ती, आचार-विचार, रूढी-प्रथा लोकांची मानसिकता, लोकांच्या आवडी-निवडी, लोकांची एकुणच जीवन जगण्याची पध्दत त्यांचा विषय बनली त्यातूनच समाजोध्दाराची आंतरिक तळमळ त्यांच्यात निर्माण झाली. यातूनन भारूड रचना लिहिण्याची प्रेरणा झाली. याशिवाय तत्कालीन समाजस्थितीही नाथांच्या भारूड निर्मीतीस कारणीभूत ठरली. तत्कालीन समाज हा अवनतीकडे वाटचाल करीत होता. त्याचवेळी नाथांनी अध्यात्म विचार भारूडातून सांगण्याचा विचार केला. लोकांना अध्यात्म पटले, अनुभवास आले की त्यांच्यातील धर्मभावना जागृत होऊन ते धर्माचरण करू लागतील व पुन्हा एकदा चैतन्यशील बनतील असा विश्वास संत एकनाथांना वाटला असावा. अध्यात्मासारखा गहन आणि गूढ विषय लोकांना सहजा-सहजी समजणार नाही याची खात्रीही त्यांना होती. त्यामुळे त्यांनी लोकजीवनात प्रचलीत असलेला भारूडासारखा लोकांचा आवडीचा गीतप्रकार निवडला.

नाथांच्या या उदात्त आणि विशाल दृष्टीकोणातून भारूडांची निर्मिती झाली. जगाकडे पाहण्याच्या त्यांच्या विशाल दृष्टीचा, लोकांविषयी त्यांच्या मनात असलेला करूणांचा आणि आतंरिक तळमळीचा परिपाक म्हणजे नाथांची भारूडे. नाथांचे समाजनिरिक्षण हे चौफेर होते. समाजाची उन्नती करावयाची असेल तर त्यांच्या अतंरंगात शिरले पाहिजे. त्यांच्याशी त्याच्याच भाषेत बोलले पाहिजे. त्यांची सुख-दु:खे समजून घेतली पाहिजेत याची जाणीव नाथांना होती. त्यामुळे लोकजीवनातील विविध घरातील, व्यक्ती, घटना - प्रसंग आणि अनुभव यांना त्यांच्या भारूडात स्थान मिळाले.

नाथांच्या भारूडांचे विश्व व्यापक असे आहे. देव - देवतांपासून ते समाजातील खालच्या थरातील व्यक्तीपर्यंत अलैकिक जीवनापासून ते लौकिक जीवनापर्यंचे अनेक, वेगवेगळे विषय नाथांनी भारूडांत घेतले आहेत. विषयाची इतकी व्यापकता विविधता असलेला कवी मराठी वाङ्मयाशिवाय व एकनाथांशिवाय कोणीही नसावा. जणू संपूर्ण विश्वच त्यांना काव्यविषय वाटत होते, इतकी विविधता त्यांच्या भारूडाला लाभलेली आहे. त्यांच्या भारूडांच्या विषयाचा महत्वाचा विशेष म्हणजे जनसामान्याना परिचित असलेले विषयच नाथांनी आपल्या भारूडासाठी निवडले. कारण हे विषय समाजाच्या अंतरंगातील होते. त्यामुळेच नाथांच्या भारूडांना समाजाभिमुखताही लाभली असे म्हणता येते. त्यांच्या एकूण भारूडांचे वर्गीकरण पुढील प्रमाणे सांगता येईल.

**व्यक्तिचित्रणात्मक भारूडे :-**

भारूडांतील विषय पाहिले की त्यांचे कौशल्य आपल्या लक्षात येते. त्यांचे हे कौशल्य त्याच्या व्यक्तिचित्रणात्मक भारूडांत पाहावयास मिळले. त्या व्यक्तिची निवड करताना त्याचे पारंपारिक विशेष, त्यांचे समाज जीवनातील स्थान, त्यांचा

व्यवसाय, त्याच्या व्यवसायातील साधने, त्यांचे स्वभाव विशेष ही नाथांनी लक्षात घेतल्यामुळे त्यांची व्यक्तिचित्रणात्मक भारूडे म्हणजे त्या व्यक्तिची चलचित्रेच आहेत. म्हणजेच नाथांनी मराठी लोकसंस्कृतीचे, मराठी लोकजीवनाशी त्यांचे असलेले नाते तर दर्शविलेच, त्या शिवाय त्यांच्याद्वारा लोकांचे अध्यात्मिक उद्‌बोधनही केले. वासुदेव, गोंधळी, वाघ्या, भुत्या, बाळसंतोष इ. व्यक्ती संस्कृती - विशेषांनी नटलेल्या आहेत. फकीर, गारूडी, डोंबारी, कोल्हाटी, जोगी अशा व्यक्तीमुळे नाथांनी एका आगळ्या वेगळ्या अनुभवाचा साक्षात्कार घडविला आहे. त्या व्यक्ती आपल्या सर्व गुण -दोषासह आणि पारंपरिक वैशिष्ट्यांसह नाथांच्या भारूडातून व्यक्त झाल्या आहेत. तसेच या व्यक्ती ज्या समाजात वावरतात त्या समाजव्यवस्थेचे, समाज जीवनाचे आणि मानवी प्रवृत्तीचे दर्शन घडवून पारलैकिकालाही स्पर्श करतात. परमेश्वर भक्ती, आत्मज्ञान, परमात्म सुख, प्रपंच इ. तत्त्वाचे महत्त्व या अभंगाच्या माध्यमातून कथन केले आहेत -

*"मुका झालो, वाचा गेली।*
*होतो पंडित महाज्ञानी, दशग्रंथ षड्‌शास्त्र पुराणी।*
*चारीवेद मुखोद गतवाणी, गर्वामध्ये झाली सर्व हानी।*
*जिव्हा लालचावली भोजना, दुग्ध घृत शर्करा पक्वान्ना।*
*साधु - संताची निंदा केली, हरि भक्तीची स्तुती नाही केली।*
*तेणे वाचा पंगु झाली"।। (मुका)*

नाथाच्या भारूडांतील प्रत्येक व्यक्तीचित्र म्हणजे परतत्वाचा साक्षात्कार आहे.

**देव - देवतावर भारूडे :-**

निर्गुण - निराकार अदिमायेवरील त्यांचे "महालक्ष्मी" भारूड लक्षणीय आहे. महालक्ष्मीचे रूप - गुण वर्णन भारूडातून दर्शवितात -

*"नवखंड पृथ्वी तुझी चोळी।*
*सदापाताळी पाडले गेली।*
*एकविस स्वर्ग मुकुटी झळाळी।*
*बया दार उघड"।*

नाथांनी आपल्या देव-देवतापर भारूडातून धर्माला आलेली ग्लानी कथन करून त्यामुळे सैर-भैर झालेले लोकजीवन यांचे चित्र रेखाटले आहे. जगात अनेक दैवते आहेत, पण त्या सर्वात श्रीहरीच सामावलेला आहे. नाथांनी हा विचार देवीच्या उपासनेतील विविधी विधीचे वर्णन करताना स्पष्ट केला आहे.

नाथांनी मागितलेल्या 'जोगव्या' चे स्वरूप असे -

*"द्वैत सारुनी माळ मी घालीन।*
*हाती बोधाचा झेंडा मी घेईन।*
*भेदरहित वारीस जाईन।। २।।*
*नवविध भक्तीच्या करीन नवरात्रा।*
*करुनी पोटी मागेन ज्ञानपुत्रा।*
*धरीन सद्‌भाव अंतरीच्या मित्रा।*
*दंभ सासरा सांडीन कुपात्रा"।। (जोगवा)*

'खंडोबा' या लोकदेवावरही नाथांची दोन भारूडे आहेत. खंडोबाचा उपासक वाघ्या देवतेचे वर्णन पुढीलप्रमाणे करतो. -

*"वाहन तुझे घोड्यावरी।*
*वरी बैसली म्हाळसा सुंदरी।*
*वाघ्या-मुरळी नाचती परोपरी।।*
*आणि वाघ्या खंडोबाची उपासना सांगतो।*
*ती अशी प्रेम नगारावारी।*
*सावध होऊनि भजनी लागा।*
*देव करा कैवारी।*
*मल्लारीची वारी, माझ्या भल्लारीची वारी"।*

नाथांच्या देव - देवतापर भारूडातून निर्गुण - निराकार परमात्म्याचे सर्व व्यापी रूप परमेश्वर आणि त्याचे दशावतार, याच प्रमाणे विविध देव - देवता एकच असून त्यांची उपासना करावी हा विचार व्यक्त झालेला आहे.

**घटना - प्रसंग - अनुभवदर्शक भारूडे :-**

समाज आणि व्यक्तीजिवनातील बारीक-बारीक घटना ही त्यांच्या काव्यदृष्टीने टिपल्या. व्यक्ती आणि समाजजिवनातील, संसारातील नित्याच्या घटना नित्याचे प्रसंग आणि जीवनजगताना येणारे अनुभव, यांची कलात्मक निवड करून नाथांनी काही भारूडे रचिली. लोकांच्या नित्याच्या परिचयातील घटना - प्रसंग जेव्हा नाथांच्या भारूडांतून व्यक्त होतात तेंव्हा त्यांना लाभलेला अर्थ लक्षणीय असतो. सासर आणि माहेर या स्त्री - जीवनातील महत्वाच्या, ठिकाणांचा, घटनांचा नाथ आपल्या भारूडांत स्वीकार करताना जे रूप देतात ते अत्यंत लक्षणीय आहे. अध्यात्मविचार सांगतात -

*"विषयाचे सासुरे दुश्चित बोळवण।*
*भ्रांतीचे पांघरुण बुंथीमज।*
*अविवेक अंबुला अहंकार सासुरा।*
*अविद्येच्या घरामजी नेले"।।*

RESEARCH JOURNEY

लौकिक जीवनातील घटना - प्रसंग आणि अनुभव यावर नाथांनी अध्यात्मिक रूपके करून अत्यंत सोप्या पद्धतीने अध्यात्म ज्ञान अज्ञानी लोकांना देण्याचा प्रयत्न केला. लौकिक जीवनातील घटना - प्रसंग आणि अनुभवाच्या आधारे अलैकित्वाचे चित्रण करण्याचे नाथांचे कसब कितीतरी भारूडातून पाहावयास मिळते.

**पशु - पक्षी - प्राणी विषयक भारूडे :-**

सृष्टीतील प्राण्यांनाही नाथांनी आपल्या भारूडातून लोकांशी संवाद करावयास लावले. त्यातून नाथांनी कल्पकता, कलात्मकता आणि कवित्व प्रत्ययास येते. सर्प, विंचू विषारी प्राणी, बैल, गाय, एडका, कुत्रा पाळीव प्राणी, टिटवी, पिंगळा, पोपट असे पक्षीही आहेत. परमेश्वरांने मानवाला दिलेला देह वासनांच्या आहारी जाण्यासाठी नाही, तर परमेश्वर भक्तीसाठी आहे. पण जीवाने मानवी देहात प्रवेश केला की तो देहाच्या आधीन होतो व मूळ रूपाला भुलतो. (प्रपंचातील सुखः - दुःखाच्या यातनेत गुरफटतो)

**नाथांचा एडका** काम - क्रोधाचे परिणाम दुष्परिणाम सांगतो -

*"एडका मदन तो, केवळे पंचानन।*
*धडक मारिती शंकरा।*
*केला ब्रम्हयाचा मातेरा।*
*इंद्रचद्राची दरारा।*
*लाविला जेणे"।।*

**नाथांचा सर्प** कसा आहे याची जाणीव पुढील प्रमाणे येते -

***"लोभसर्प डंबालाकरु काय।***
***स्वार्थ संपत्तीने जड झाला पाय।***
***अशा लहरी तापला माझा देह।***
***तृप्तिवारा घाली वो गुरुमाय"।।***

म्हणून नाथांच्या प्राणी सृष्टीवरून आपल्याला पंचतंत्रातील प्राण्यांची आठवण येते.

**वस्तु विषयक भारूडे :-**

नाथांच्या भारुडातील निर्जीव वस्तू बोलक्या असून सजीवांना लाजवतील असे त्यांचे बोल आहेत. अज्ञानाच्या वस्त्राचे वर्णन रहाट या भारुडातून नाथ करतात -

***"हुंडगी निघाली बाजारा।***
***बरिक माझा जुना।***
***दारची गोधन का तोडाना।***
***मजला रहाट करुन का द्याना।***
***माझे रहाटाकडे का पाहता"।।***

आत्मज्ञानामुळे अज्ञान दूर झाले व जीवाला परमात्म्याची ओढ कशी लागली याचे लक्षणीय चिंतन या भारूडातून नाथांनी केले आहे. मोती या भारूडातील पुढील मौलीक विचार-

***"प्रपंच धोंडा मृगजळ पाणी।***
***आपटीत होते चोळी।***
***विसरले सुख घसरले तळी।***
***सखे मायेने मोती दडविले।***
***भवसिंधूच्या जळी।***
***होती गडे भ्रांती बहीण जवळी"।***

अविद्येच्या पाण्यात प्रपंचाचा धोंडा होता आणि त्यावर देहबुध्दीची चोळी धुत असतांना निजसुखमोती हरवला तो भवसागरातळी गेला, हा विचार नाथांची मांडला आहे. भारूडे, मग ती व्यक्ती चित्रणात्मक असो की सांसरिक असो, त्यातून येणारे वस्तू -उल्लेख हे परतत्वांनी स्पर्श झालेले आहेत.

**खेळ विषयक भारूडे:-**

समाज जीवनातील मनोरंजन प्रकारांचा स्वीकार करून त्यावरही नाथांनी काही भारूडे रचिली आहेत. (१) गारूडी, डोंबारी, कोल्हाटी इ. पारंपारिक भटक्या लोकांच्या खेळांचा - हे लोक पोटासाठी गावोगाव भटकत खेळ करून लोकरंजन करतात. (२) लोकजीवनात मनोरंजनासाठी जे खेळ खेळले जातात. त्यांचा फुगडी, पिंगा, लपंडाव, विटी-दांडू, चेंडू-फळी, टिपरी इ. खेळावर नाथांची भारूडे आहेत. समाजात नीती आणि सदाचार असेल तरच तो समाज जीवनातला खरा-खुरा आनंद घेऊ खकतो आणि अध्यात्माशिवाय नीती आणि सदाचार अंगी बाणत नाहीत. म्हणूनच नाथ लौकिक जीवनातील, लोकांच्या परिचयातील माध्यमातून लोकांना रूचेल, आवडेल, पचेल अशा भाषेतून अध्यात्मबोध करतात. नाथांची फुगडी अशीच लक्षणीय आहे -

***"तुम्ही आम्ही दोघीजणी।***
***मिळूनिणी सखये।***
***मनबुध्दी चित्तटाकी।***

*पिळूनिजी सखये।*
*जिव शिव भेद - भाव।*
*गिळूनीजी सखये।*
*फुगडी फु नको होऊ।*
*फू, फू, फू, फू, फुगडी"।।*

**पत्रात्मक भारूडे :-**

नाथांच्या शोधक आणि कल्पक दृष्टीतून तत्कालीन सरकार दरबारचा पत्रव्यवहार सुटलेला नाही. आशीर्वाद, पत्र, विनंती, अभयपत्र, अर्ज, अर्जदास्त, अर्जाचा जाब, ताकीद पत्र, जाबचिठ्ठी, करूलपत्र इ. भारूडांचा समावेश या वर्गात करता येतो नाथांच्या पत्रात्मक भारूडांचा महत्वाचा विशेष म्हणजे या भारूडातून तत्कालीन राजकिय आणि सामाजिक परिस्थितीचे दर्शन आपणास घडते.

नाथांनी पत्रात्मक भारूडांतून त्याच्या परिचयातील उपमानांच्या आधारे आणि रूपकांच्या आश्रयाने पाटील, कुलकर्णी, पटवारी, देशपांडे , देशमुख, आणि इतर सरकारी अधिकाऱ्यांच्या दुराचारी वर्तनांचे दर्शन घडविले, त्याचप्रमाणे प्रपंच्यात राहून परमार्थ साधन कसे करावे याचेही मार्गदर्शन केले आहे.

पत्रात्मक भारूडाचा एक नमूना -

*"चिरंजिव शिवाजीपंत ठाणेदार।*
*वास्तव देहपूर।*
*यासी आत्मारामपंत यांचा आशीर्वाद।*
*पत्र लिहिणे कारण जे ।*
*तुम्हासी देहगावची सनद।*
*शंभर वर्षाची देऊ पाठविले।*
*गावाची आबादी करावी।*
*काम - क्रोध हे रयत त्यांचे ऐकू नये।*
*आशा मनशा यांची संगत धरु नये।*
*सदा स्वधर्मे वागणूक ठेवणे"।*

तत्कालीन समाजजिवनात वावरत असलेल्या दुर्वर्तनी, दुराचारी, अधिकाऱ्यांची, गावाचा कारभार पाहणाऱ्या पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे इ. कारभाऱ्यांची नाथांनी तत्कालीन समाजजिवनाचे, वृत्ती - प्रवृत्तीचे दर्शन घडविण्याचे त्यांचे प्रयत्न अत्यंत महत्वाचे
आहेत.

**संकीर्ण भारूडे :-**

नाथांची भारूडे विविध विशेषांनी नटलेली असल्यामुळे त्यांचे शास्त्रोक्त वर्गीकरणे तसे अवघडच आहे. पण आणखी कांही भारूडे आहेत की त्यांचा एक स्वतंत्र वर्ग आहे. बेटकुळी, अक्कल, हिंदू - तुर्क संवाद, चिरंजीवपद, हुशारी, मुंडा, दरवेश, हापसी, जोहार, होळी, शिमगा, छापा, गोपाळ वेणू इ. भारूड.

नाथांच्या भारूडांची विश्‍व पाहिले की त्यातील विषय वैचित्र्याची जाणीव होते. त्यांचे प्रत्येक भारूड म्हणजे जीवनाच्या व्यक्त आणि साक्षात्कारी अनुभवाचा अनुभव आहे.

**नाथांच्या भारूडांचे स्वरूप - विशेष :-**

लोकरंजनाच्या माध्यमातून लोकांना रंजनाबरोबरच परमार्थ आणि निती यांचे पाठ द्यावेत अशी नाथांची अंतरीक तळमळ होती. म्हणून त्यांनी दैनंदिन जिवनातील, समाजातील, कुंटूंबातील वैशिष्ट्यपूर्ण व्यक्ती, पशु-पक्षी-प्राणी, घटना-प्रसंग-

अनुभव आणि मनोरंजनाची साधने यांच्या माध्यमातून लोकांच्या अनुभवाच्या आधारे लोकभाषेतून त्यांनी परमार्थाचे यथार्थ वर्णन भारूडांच्या रूपाने लोकापुढे ठेवले. नाथांच्या कल्पकतेतून, चिंतनशिलतेतून आणि लोकोद्धाराच्या तळमळीतून निर्माण झालेले भारूडांचे विश्व अनुभव संपन्न बनले. आजही नाथांची भारूडे मराठी लोकजीवनात लोकप्रिय ठरत आहेत.

**संदर्भ सूची :-**

१. एकनाथांची भारूडे : शरद व्यवहारे - साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद.
२. एकनाथी भारूड : पाठक वा.ल.
३. संत एकनाथांचे स्फूट लेखन : डॉ. सौ. कुमुद गोसावी.
४. सकल संत गाथा भाग ३ : डॉ. रा.चिं. ढेरे.